
कार्यालय गट ग्रामपंचायत
बेसा - बेलतरोडी
पंचायत समिती नागपूर, जिल्हा नागपूर





सौ. शालिनी कंगाली
सरपंच

श्री. सुरेन्द्र बानाईत
उपसरपंच

श्री. इंद्रजित डा. ढोकणे
ग्रामविकास अधिकारी

सभासद

श्री. नरेन्द्र बानाईत - सदस्य

श्री. नारायण चिंचोणे - सदस्य

श्री. संजयजी भोयर - सदस्य

श्री. संजय जांगडे - सदस्य

श्री. सूरज कापर्तिवार - सदस्य

श्री. इस्माईलखाँ पठाण - सदस्य

श्री. मनोज मेश्राम - सदस्य

सौ. वैशाली ढोणे - सदस्या

नंदा इंगळे - सदस्या

सौ. कल्पना कांबडे - सदस्या

सौ. माधवी राजुरकर - सदस्या

सौ. पुष्पा अतकरे - सदस्या

सौ. लक्ष्मी मसराम - सदस्या

सौ. सुप्रिया पाटील - सदस्या

सौ. शोभा चौरेवार - सदस्या

जावक क्र.

दिनांक : ६१७ २३/१/२०१६

प्रति

श्री.प्रदिप वसंतराव वानखेडे व इतर

रा.बेसा,नागपूर

विषय : बांधकाम परवानगी देण्याबाबत.

संदर्भ : ०१) अर्जदार श्री.प्रदिप वसंतराव वानखेडे व इतर यांच्या अर्ज क्र. ४९५/१९/०९/२०१६ अन्वये.

०२) ग्रामपंचायत मासिक सभा दि.२०/०९/२०१६ ठराव क्र.४/२८ अन्वये.

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की आपल्या संदर्भीय अर्जानुसार सभेत चर्चा करुन शासनाने व नगरविकास विभागाने दि.२१/११/२०१३ रोजी मंजुर केलेल्या विकास योजना विकास नियंत्रण नियमावली च्या कलम २३.१.१ या अटी व शर्तीच्याअधिन राहुन ठरावातील सर्व अटीचे पालन करण्याच्या शर्तीवर बेसा गावठान घर क्र.०१ आणि जुना क्र.१८ नविन ७३ क्षेत्रात बांधकाम परवानगी देण्यात येते.

वरिल प्रमाणे आपल्या कडुन कुठल्याही अटीचे पालन न झाल्याचे आढळल्यास दिलेली परवानगी पुर्वलक्षी प्रभावाने रद्द समजण्यात येईल. याची संपुर्ण जबाबदारी आपली राहील.

सबब बांधकाम परवानगी देण्यात येते.

सरपंच
ग्रा. पं. बेसा
पं. स नागपूर

प्रोसिडिंगबुक (कारवाईबुक)

ग्रामपंचायत बेसा तहसील नागपूर जिल्हा नागपूर सन २०१६



नंबर सभेचा दिनांक व तारीख	हजर सभासदाची नावे	ठरावाचा मसुदा	सुचक / अनुमोदक	थोडक्यात चर्चा	मतदान			ठराव पास किंवा नापास	सचिवाचे मत	अधिकाऱ्याची सही
					तर्फेची संख्या व सही	विरोधकाची संख्या व सही	तटसंस्थाची संख्या व सही			
२०/०९/२०१६	१) मा. सौ. शालीनीताई कंगाली सरपंच व इतर उपस्थित सभासद	ठराव क्र. ४/२८ **विषय : श्री.प्रदीप वसंतराव वानखेडे व इतर यांच्या अर्जावर विचार करणे.**	खुलासा	आज दि. २०/०९/२०१६ रोजी ठीक ११.०० वा. मा. सरपंच सौ. शालिनीताई कंगाली यांच्या अध्यक्षतेखाली सभा आयोजित करण्यात आली. सभेत खालील विषयावर चर्चा करण्यात आली. विषयात दर्शविल्याप्रमाणे आजच्या सभेत सर्वानुमते चर्चा करण्यात आली की, अर्जदारांनी ग्रामपंचायत कडे बांधकाम परवानगी करीता अर्ज केला आहे. सदर बांधकामाला कुणाचे आक्षेप आहे किवा कसे याकरिता आक्षेप मागविण्याबाबत जाहिरनामा प्रसिध्द करण्यात आला असता कुणाचेही लेखी आक्षेप ग्रामपंचायतला प्राप्त झाले नाही. त्यामुळे आजची सभा अर्जदाराचे बेसा गावठाणातील मालकीचे घर क्र. १ आणि जुना १८ नविन ७३ शासनाच्या व नगरविकास विभागाच्या दि. २१/११/२०१३ रोजी मंजुर केलेल्या विकास योजना विकास नियंत्रण नियमावली च्या कलम २३.१.१ या अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन करण्याच्या अधिन राहून त्याचप्रमाणे ग्रामपंचायतच्या पुढील अटीवर बांधकाम परवानगी देण्यात येते. १) मंजुर चटईक्षेत्रा प्रमाणेच बांधकाम करावे लागेल. २) बांधकामातील पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, गडर लाईन, रस्ते व दिवाबत्ती अर्जदाराला स्वत: करावी लागेल. ३) शासन नियमाप्रमाणे पाऊस पाणी संकलनाकरीता रूफटॉप हॉरवेस्टींग अध्यावती युनीट उभारून वॉटर हॉरवेस्टींग करावी लागेल. ४) बांधकामातील सर्व मुलभुत सुविधा अर्जदारांना स्वत: करावी लागेल. याबाबत ग्रामपंचायत कसलाही भार सहन करणार नाही. ५)बांधकामातील विजव्यवस्था करतांना गावातील						

				विजपुरवठयावर त्याचा विपरीत परिणाम होऊ नये याकरिता स्वतंत्र डिपी घ्यावी लागेल. ०६) वरिल प्रमाणे सर्व अटीचे काटेकोर पालन करावे लागेल. त्याचप्रमाणे शासन व नगरविकास विभागाच्या सर्व अटीचे काटेकोर पालन करावे लागेल. आजची सभा पुढे असेही ठरविते की, वरील पैकी कुठल्याही अटीचे पालन अर्जदाराकडून न झाल्यास बांधकाम परवानगी पुर्वलक्षी प्रभावाने रद्द समजण्यात येईल. आणि त्याची सर्व जबाबदारी अर्जदाराची राहील. याकरीता ग्रामपंचायत जबाबदार राहणार नाही. करीता अर्जदाराचे स्वत:च्या जबाबदारीवर बांधकाम परवानगी देण्यात येते. करिता चर्चा अंती ठराव सर्वानुमते मंजुर.						

सरपंच
ग्रा. पं. बेसा
पं. स नागपूर

ग्राम विकास अधिकारी
ग्राम पंचायत बेसा (बेलतरोडी)